International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# राष्ट्रीय सेवा योजना आणि व्यक्तिमत्व विकासास चालना

**प्रा. डॉ. विठ्ठल पंडितराव सांडूर**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा
**Corresponding Author: प्रा. डॉ. विठ्ठल पंडितराव सांडूर**
**DOI- 10.5281/zenodo.14249232**

**सारांश:**

राष्ट्रीय सेवा योजना हे व्यक्तिमत्त्व विकासाचे खुले व्यासपीठ आहे. समाजातील युवकांना सामाजिकतेचे भान प्राप्त करून समाजाला उन्नत करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करत आहे. युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाकरिता त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध पैलूंना फुलवण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना सातत्याने कार्यरत आहे. विद्यार्थी विकास ते राष्ट्रविकास या व्यापक स्तरावर योजना कार्य करते. ग्राम ते राष्ट्रस्तरावर अनेक युवक या योजनेत सहभागी होऊन देश विकासास हातभार लावत आहेत. छोटया प्रश्नापासून ते मोठया देश पातळीवर प्रश्नांपर्यंत सर्वच प्रश्न सोडविण्याचे उत्तर राष्ट्रीय सेवा योजनेकडे आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून निस्वार्थपणे समाजकार्य व विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. समाजाच्या सेवेतून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साकारण्यासाठी तसेच शिक्षणाद्वारे समाजसेवा घडविण्यासाठी ही सेवा खुप महत्त्वाची आहे. आज या योजनेत सुमारे ३२ लाखापेक्षा अधिक विद्यार्थी देश भरातून सदर योजनेत सहभागी आहेत. अनेक युवक आणि युवतींमध्ये राष्ट्रविकासाप्रतीची नवी उमेद दिली आहे. जनसामान्यांच्या मनात योजनेविषयी खूप आदरभाव तयार करण्यास सदर योजना यशस्वी झाल्याचे आपणास दिसून येते. एकदा का कोणताही स्वयंसेवक विद्यार्थी या योजनेत सहभागी झाला की तो आयुष्यभर या योजनेशी नकळतपणे जोडला जातो आणि आयुष्यभर मी एनएसएसचा स्वयंसेवक आहे हे अभिमानाने सांगतो, तेव्हा ज्या उद्येशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली तो उद्येश सफल झालेला दिसून येतो एकंदरीत व्यक्तीमत्वाच्या विकासाला प्रेरणा देण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेतून होत असलेले दिसून येते.

**मुख्य शब्द:** समाजकार्य, विद्यार्थी विकास, व्यक्तीमत्वाचा विकास, समाजसेवा

**प्रस्तावना**

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर थोर पुरुषांच्या मनात भारताच्या ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी तसेच गाव खेड्यापर्यंत पोहोचण्यासाठी काहीतरी योजना असणे आवश्यक असल्याचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी मत व्यक्त केले त्यातूनच लाखो विद्यार्थी एकत्र येऊन समाजसेवेचे काम करणारी अशी कोणती तरी संघटना देश पातळीवर असावी यासाठी विचार मंथन सुरू झाले भारतासारखा कृषीप्रधान देश बहुतांशी जनता खेड्यात राहणारी या दोन्ही घटकांचा विचार करून एखादी संघटना देश पातळीवर असावी असा त्यामुळे जगातली एकमेव तरुणांची संघटना राष्ट्रीय सेवा योजनेकडे पाहिले जाते तरुणांच्या मनात देश प्रेमाबरोबर सामाजिक कार्याची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली यातून ग्रामीण भागातील विकासाला चालना मिळाली विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन शिस्त सदाचार बांधिलकी इत्यादी गुणांचा विकास होतो याबरोबरच राष्ट्र विकासाच्या दृष्टीने विविध प्रकारचे संस्कार करणारी एक महत्त्वाची योजना असून यातून राष्ट्र विकासाला चालना मिळाली स्वच्छतेचे पाईक व स्वच्छतेचे पुजारी आजच्या युवकांनी त्याचा बोध घेतला पाहिजे, या हेतुने राष्ट्रीय सेवा योजनची स्थापना करण्यात आली.

संशोधनाचा उद्देश

1. राष्ट्र विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका अभ्यासणे
2. समाज विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य पाहणे
3. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला चालना राष्ट्रीय सेवेने मिळाली का?

**भारतातील राष्ट्रीय सेवा योजनेची उत्क्रांती**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणत, "गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा । गाव भंगता येईल अवदशा । देशामाजी ।।" म्हणून राष्ट्राचा उद्धार व्हावा असे वाटत असेल तर आधी ग्रामोद्धार झाला पाहिजे. महाविद्यालयीन अभ्यासक्रमाला राष्ट्रसेवेची जोड देऊन राष्ट्रोद्धार कसा साधता येईल, या दृष्टीने 1950 ते 1969 पर्यंत तत्कालीन विश्वविद्यालय आयोगाचे अध्यक्ष डॉ.

सर्वपल्ली राधाकृष्णन, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, केंद्रीय मंत्री डॉ. सी. डी. देशमुख, प्रो. के. जी. सैयद्दीन, शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. दौलतासिंग कोठारी, शिक्षणमंत्री डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव, भारतातील विद्यापीठांचे कुलगुरू, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यात विचार विनिमय झाला. राष्ट्रीय सेवा ही राष्ट्रीय एकात्मतेसाठी एक 'सशक्त साधन' सिद्ध होऊ शकते, शहरी विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन अवगत होईल. आणि महात्मा गांधी जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून दि. 24 सप्टेंबर 1969 रोजी भारतातील सर्व राज्यांतून 37 विद्यापीठांत पदवीपूर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांकरिता प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली.

पुढे या योजनेला देशव्यापी स्वरूप प्राप्त करून दिले आज देशभरातील सर्वच विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये या योजनेची व्याप्ती वाढलेली दिसून येते.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद आहे,**

**NOT ME BUT YOU**

**'मला नाही तुम्हाला'. नि:स्वार्थ सेवाभाव त्यामागे आहे.**

देशातील तरुणा तरुणांच्या मनात देश प्रेमाबरोबर सामाजिक कार्याची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली यातून ग्रामीण भागातील विकासाला चालना मिळाली

**राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे:**

1. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक ज्या समुदायात काम करतात ते समजून घेणे आणि त्यांच्या समुदायाच्या संबंधात स्वतःला समजून घेणे;
2. समाजाच्या गरजा आणि समस्या ओळखणे आणि समस्या सोडवण्याच्या व्यायामात स्वतःला सामील करणे;
3. आपापसात सामाजिक आणि नागरी जबाबदारीची भावना विकसित करणे;
4. वैयक्तिक आणि सामुदायिक समस्यांवर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करणे;
5. सामुदायिक सहभाग एकत्रित करण्यासाठी कौशल्ये प्राप्त करणे;
6. नेतृत्व गुण आणि लोकशाही मूल्ये आत्मसात करणे;
7. आपत्कालीन परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याची क्षमता विकसित करणे; आणि
8. राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक एकोपा सराव करणे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे'कॅम्पस आणि कम्युनिटी', 'कॉलेज आणि व्हिलेज' आणि 'ज्ञान आणि कृती' यांच्यात अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वरूप**

रासयोच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रम असे वर्गीकरण केले आहे. एका महाविद्यालयाने जवळचे खेडे दत्तक घेऊन त्याचा विकास साधण्याकरिता गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प प्रतीकात्मक स्वरूपात विद्यार्थ्यांनी कार्यान्वित करावेत. त्यातून त्यांचे संघटन कौशल्य विकसित होईल. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध सामाजिक गटांना एका राष्ट्रीय घटकात आणि प्रवाहात सामील करून घेण्याची प्रक्रिया होय. दत्तक गावात कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी हे राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व पटवून सांगतात व क्रियात्मक रूप देतात. व्यक्तिमत्त्व विकास योजनेचे ध्येय आहे. शिक्षित जनशक्तीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याची प्रक्रिया म्हणजे रासेयो होय.

व्यक्तिमत्त्वाच्या निरनिराळया व्याख्या करण्यात आल्या आहेत. सांख्य तत्त्वज्ञानी हे सात्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकारचे व्यक्तिमत्त्व मानतात. मानसशास्त्रज्ञ ऑलपोर्ट यांनी अशी व्याख्या केली की, "व्यक्तीचे वैशिष्ट्यपूर्ण वर्तन व विचार निर्धारित करणारे, तिच्या अंतर्गत असणारे मनोशारीरिक संस्थांचे गतिशील संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय."

मानसशास्त्रज्ञ गिलफोर्ड यांच्या मते, "व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीतील गुणविशेषांचा वैशिष्ट्यपूर्ण आकृतिबंध होय." गुणविशेष म्हणजे व्यक्तीला इतरांपेक्षा वेगळे ठरवणारा टिकाऊ वर्तन प्रकार. अध्ययनामुळे निर्माण होणा-या अर्जित प्रवृत्ती म्हणजे गुणविशेष. लहानपणापासून व्यक्तीला जे विविध अनुभव येतात त्यातून हळूहळू गुणविशेष निर्माण होतात. रा. से. योजना तर अनुभवांचे भांडारच आहे. त्या अनुभवांतून गुणविशेष निर्माण होऊन विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व साकारले. जाते. लोकांना प्रिय असणारे राष्ट्रभक्ती, सेवाभावीवृत्ती, विज्ञान निष्ठा, प्रामाणिकपणा, उदारता, विश्वासपात्रता, आशावाद, खेळाडूवृत्ती इत्यादी गुण संपादन केल्या जातात. शिबिर कालावधीमध्ये सहजीवन, सहशिक्षण व सहभोजन या प्रक्रियांच्या माध्यमातून सर्वधर्मी समानत्व या भावनेचा विकास होतो. कॅरेन हॉर्नी आणि हॅरी स्टॅक सलीव्हन या मनोविकास चिकित्सकांच्या मतानुसार, 'चांगले सामाजिक संबंध' हा उत्तम विकसित व्यक्तिमत्त्वाचा पाया आहे. जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्तीच्या स्वास्थ्याची व्याख्या अशी केली की, "Health is a state of complete physical,

mental and social well-being and not merely the absence of disease or infirmity." राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात काम करताना विद्यार्थी चांगले सामाजिक संबंध प्रस्थापित करू शकतात. चांगले सामाजिक संबंध ठेवण्याकरिता सामाजिक कौशल्य अवगत करावे लागते. संवाद कौशल्यामुळे ते शक्य होऊ शकते. दुस-या व्यक्तीच्या मनात आपले म्हणणे प्रस्थापित झाल्याची पावती त्या व्यक्तीकडून प्राप्त झाल्याशिवाय संवाद साधल्या गेला असे म्हणता येणार नाही म्हणून संवाद कुशलतेने करण्याची आवश्यकता आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना दत्तक गावात विविध प्रकारचे सर्वेक्षण करावे लागते. नवीन नवीन योजनांची माहिती घ्यावी लागते. त्यावेळी लोकांशी संवाद साधावा लागतो, या सरावामुळे ते संवादकौशल्य अवगत करू शकतात. वाचनाच्या सवयीमुळे भाषेवर प्रभुत्व मिळवता येते. वक्तृत्व हा एक व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी पैलू आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सभा संचालन, प्रास्ताविक भाषण, मनोगत, आभार प्रदर्शन करावयाचे असते. यामुळे त्याच्या ठिकाणी सभाधीटपणा येतो. सरावाचे सातत्य टिकू न ठेवल्यास त्यांची वक्तृत्व कला विकसित होते. मैदानी वक्तृत्वाचा लाभ होतो. भाषाप्रभुत्वामुळे मोठमोठ्या सभा जिंकण्यास ते समर्थ ठरतात. उपस्थित निरक्षरांपासून तर उच्चविद्या विभूषितांमध्ये राष्ट्रीय विचार रुजवू शकतात. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे ओघानेच त्यांच्याकडे नेतृत्व चालून येते, असे अनुभवाने सिद्ध झालेले आहे. अशाप्रकारे राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वरदान ठरली आहे, यात शंका नाही.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व**

राष्ट्रीय सेवा योजना हा भारतातील तरुणांमध्ये नागरी जबाबदारी आणि समुदाय विकासाला चालना देणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. हँड-ऑन सामुदायिक सेवा उपक्रमांद्वारे, राष्ट्रीय सेवा योजना सर्वांगीण विकास, सामाजिक जागरूकता आणि व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यास प्रोत्साहन देते. हे समुदायांना सक्षम बनवते, विविध तरुणांना एकत्रित करते आणि आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या समस्यांचे निराकरण करून राष्ट्रीय विकासात योगदान देते. राष्ट्रीय सेवा योजना चारित्र्य निर्माण करण्यात, नेतृत्वाच्या संधी प्रदान करण्यात आणि सहानुभूती आणि जबाबदारीची मूल्ये प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यामुळे ती सकारात्मक बदल आणि शाश्वत विकासासाठी एक महत्त्वपूर्ण शक्ती बनते.आपल्या देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची महत्त्वाची भूमिका दिसून येते. देशातील युवाशक्तीला नवचेतना देण्याचे कार्य हे देशातील राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे.युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षण क्षेत्राद्वारे होत असताना दिसत आहे. प्रभावी व्यक्तिमत्त्व घडवत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे. तरुणांमध्ये समाजसेवेची जाण झाल्यानंतर त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे राष्ट्रसेवा होय.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे फायदे**

राष्ट्रीय सेवा योजनेत सहभाग घेतल्याने अनेक फायदे मिळतात, ज्यामुळे व्यक्तींचा वैयक्तिक आणि सामाजिक विकास होतो. राष्ट्रीय सेवा योजना मध्ये सहभागी होण्याचे मुख्य फायदे आहेत ते पुढील प्रमाणे.

1. **नागरी सहभाग:** राष्ट्रीय सेवा योजना सामुदायिक सेवेत सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देते, नागरी जबाबदारीची भावना वाढवते आणि समाजाच्या कल्याणासाठी वचनबद्धतेला प्रोत्साहन देते.
2. **सर्वांगीण विकास:** स्वयंसेवक सर्वांगीण विकासाचा अनुभव घेतात, नेतृत्व, संघकार्य आणि शैक्षणिक शिक्षणाच्या पलीकडे असलेल्या व्यावहारिक कौशल्यांमध्ये मौल्यवान अंतर्दृष्टी प्राप्त करतात.
3. **सामाजिक उत्तरदायित्व:** राष्ट्रीय सेवा योजना मधील सहभागामुळे सामाजिक समस्यांबद्दल उच्च जागरूकता निर्माण होते, समुदायांसमोरील आव्हानांना तोंड देण्यासाठी जबाबदारीची भावना निर्माण होते.
4. **सामुदायिक प्रभाव:** सहभागी आरोग्यसेवा, शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रात पुढाकार घेऊन समुदायाच्या विकासात थेट योगदान देतात.
5. **नेतृत्वाच्या संधी:** स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्पांमध्ये नेतृत्वाची भूमिका घेण्याची संधी असते, त्यांना निर्णय घेण्याचे आणि संघ व्यवस्थापनामध्ये मौल्यवान अनुभव मिळतो.
6. **चारित्र्य निर्माण:** राष्ट्रीय सेवा योजना निस्वार्थीपणा, सहानुभूती आणि बांधिलकीची मूल्ये वाढवते, व्यक्तींच्या चारित्र्य निर्मितीमध्ये योगदान देते आणि त्यांना जबाबदार नागरिक बनवते.

7. **पर्यावरण जागरूकता:** स्वयंसेवक पर्यावरण संवर्धन कार्यात सक्रियपणे गुंतलेले असतात, जागरुकता वाढवतात आणि टिकावासाठी जबाबदारीची भावना निर्माण करतात.
8. **आरोग्य आणि स्वच्छतेचे समर्थन:** राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम सार्वजनिक आरोग्य जागरूकता, स्वच्छता पद्धतींचा प्रचार आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा उपायांबद्दल समुदायांना शिक्षित करण्यात योगदान देतात.
9. **राष्ट्रीय एकात्मता:** राष्ट्रीय सेवा योजना विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना एकत्र आणते, राष्ट्रीय एकात्मतेला प्रोत्साहन देते आणि विविधतेत एकतेची भावना वाढवते.
10. **वैयक्तिक पूर्तता:** इतरांच्या कल्याणासाठी योगदान देणे आणि समुदायांमध्ये सकारात्मक बदल पाहणे वैयक्तिक पूर्तता आणि कर्तृत्वाची भावना आणते.
11. **करिअरचे फायदे:** राष्ट्रीय सेवा योजना मधील सहभाग विद्यार्थ्याचा परीचय पत्र वाढवू शकतो, नेतृत्व, सामाजिक जबाबदारी आणि सामुदायिक प्रतिबद्धता यासारखे गुण प्रदर्शित करू शकतो, जे भविष्यातील करिअरच्या शोधात मोलाचे ठरू शकतात.

राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सांगताना त्यात सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या आयुष्यातील सेवेचे महत्त्व विशद करतात. विशेषत: शिक्षण क्षेत्रातून सेवासंस्कार तरुणांवर व्हावा, तरुणांकडून राष्ट्रसेवा घडावी, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा, या हेतूने शिक्षण क्षेत्रात विविध योजना वेगवेगळया स्तरावर राबविल्या जातात. शिक्षण क्षेत्रात कनिष्ठ स्तरापासून ते उच्चशिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमापर्यंत राष्ट्रसेवेची व्याप्ती वाढताना दिसून येतेस्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्यशिक्षण हे सर्व स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा, तसेच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे. राष्ट्रीय सेवा योजनाचा भविष्यातील दृष्टीकोन.

पुढे पाहता, राष्ट्रीय सेवा योजना चे भवितव्य आशादायक आहे. कार्यक्रम जसजसा विकसित होत आहे, तसतसे तंत्रज्ञानाचा लाभ घेणे, पोहोच वाढवणे आणि सरकारी आणि गैर-सरकारी संस्थांसोबत भागीदारी करणे यावर भर दिला जात आहे. उदयोन्मुख सामाजिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण पध्दतींचे एकत्रीकरण महत्त्वाचे ठरेल.

शेवटी, राष्ट्रीय सेवा योजना ही समाजसेवेत तरुणांच्या सहभागाचे एक दिवाण म्हणून उभी आहे. त्याच्या बहुआयामी दृष्टीकोनातून, राष्ट्रीय सेवा योजना केवळ स्वयंसेवकांचे जीवनच समृद्ध करत नाही तर ती सेवा देत असलेल्या समुदायांवरही कायमचा प्रभाव टाकते. आपण भविष्याकडे पाहत असताना, राष्ट्रीय सेवा योजना ची निरंतर वाढ आणि अनुकूलता ही सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडवण्यात आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक प्रमाणपत्र हे समाजाच्या मोठ्या भल्यासाठी व्यक्तींच्या वचनबद्धतेचा आणि योगदानाचा दाखला बनतो.

**निष्कर्ष**

अलीकडच्या काळात समाजात वेगवेगळया विचित्र घटना घडताना आपण पाहत आहोत. अशा परिस्थितीत आजचा तरुण कुठे तरी भरकटत जाऊ नये म्हणून राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमातून समाजपरिवर्तन करण्याचे कार्य आज राष्ट्रीय सेवा योजनेचा तरुण करीत आहे. पर्यावरणासंबंधी वृक्षारोपण, सीसीटीव्हीचे काम, ग्रीन ऑडिट, आपत्ती व्यवस्थापन, जैवविविधता, निर्माल्य संकलन, जलसाक्षरता, समाजाप्रती कन्यारत्न वाचवा अभियान, आर्थिक, कौटुंबिक व शैक्षणिक सर्वेक्षण आदी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची ही युवा चळवळ अखंड सुरू राहावी यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार मूलभूत योजनांचा सतत प्रचार व प्रसार या युवा चळवळीच्या माध्यमातून करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची ही युवा चळवळ राष्ट्र व समाजासाठी तत्पर व सक्षम व्हावी, यासाठी तो कवी दिलशादच्या ओळी म्हणत आपला उद्देश मांडतो.

उठे समाज के लिए उठे उठे
जगे स्वराष्ट्र के लिए जगे जगे
स्वयं सजे वसुंधरा संवार दे
स्वयं सजे वसुंधरा संवार दे|

**संदर्भ सूची:**

1. डॉ. पंकज कुमार ननवरे, राष्ट्रीय सेवा योजना समाज जीवनातील योगदान ,अथर्व प्रकाशन 2020.
2. डॉ. संजय चाकणे ,राष्ट्रीय सेवा योजना डायमंड प्रकाशन.

3. गव्हर्मेंट ऑफ इंडिया मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर, द नॅशनल सर्व्हिस स्कीम, न्यू दिल्ली.
4. डॉ. व्ही सी दंडे. राष्ट्रीय सेवा योजना एक दृष्टीशेप, प्रावर्तन प्रकाशन 2016.
5. प्रा. डॉ. रजनी लुंगसे, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रीय सेवा योजना अथर्व पब्लिकेशन.